५.८५
३०.६.२०२३

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ३०/०६/२०२३

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

माननीय आयुक्त श्री.अजीज शेख साहेब यांनी उल्हासनगर महापालिका क्षेत्रात झालेल्या नालेसफाईची पाहणी केली. सदर वेळी श्री.मनीष हिवरे, ए.पी.एच.ओ., श्री. एकनाथ पवार व श्री. विनोद केणे, सी.एस.आय. तसेच श्री. अनिल खतुरानी, सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती क्रमांक १ व सर्व संबंधित स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

माननीय आयुक्त यांनी शहरातील पाणी साठणाऱ्या ठिकाणांची पाहणी केलेली असून, परिस्थिती सामान्य असल्याने सर्व अधिकारी यांनी कार्यक्षेत्रात उपस्थित राहून आपत्तीच्या दृष्टीने वेळोवेळी कार्यवाही करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

आज कलानी कॉलेज येथील नाला पाहणी करतेवेळी पाण्यास अडथळा निर्माण करणारे अनधिकृत बांधकाम निदर्शनास आल्याने सदरचे बांधकाम तात्काळ निष्कासित करून पाणी जाण्यास मार्ग मोकळा करून देण्यात आलेला आहे. यापुढेही अशीच कारवाई निरंतर करण्याबाबत माननीय आयुक्त यांनी सूचना दिलेल्या आहेत.

आपत्तीजनक परिस्थिती हाताळण्याकरता महापालिका तत्पर असून सर्व प्रभाग समिती कार्यालय येथे रात्रपाळीत कर्मचाऱ्यांच्या टीमही नियुक्त करण्यात आलेल्या आहेत तसेच आरोग्य विभागातील इतर अधिकारी आणि कर्मचारी देखील तत्पर असून आपत्तीजनक परिस्थितीचा सामना करण्यासाठी माननीय आयुक्त यांनी दिलेल्या सूचनानुसार वेळोवेळी कार्यवाही करण्यात येणार आहे.

धोकादायक इमारतींबाबतही सर्व प्रभाग क्षेत्र अधिकारी यांना योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

30/6/23

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
   - सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.